.. Namadeva Arati ..

॥ नामदेवाची आरती ॥

जन्मतां पांडुरंगे जिव्हेवरी लिहिलें ।
अभंग शतकोटी प्रमाण कवित्व रचिले ॥ १॥

जय जयाजी भक्तराया जिवलग नामया ।
आरती ओंवाळीतां चित्त पालटे काया ॥ धृ ॥

घ्यावया भक्तिसुख पांडुरंगे अवतार ।
धरूनियां तीर्थमेषें केला जगाचा उद्धार ॥ जय ॥ २॥

प्रत्यक्ष प्रचितीं हे वाळवंट परिस केली ।
हारपली विषमता द्वैतबुद्धि निरसली ॥ जय ॥ ३॥

समाधि महाद्वारी श्रीविठ्ठलचरणीं ।
आरती ओंवाळीतों परिसा कर जोडुनी ॥ जय ॥ ४॥

इति

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 27, 1999